# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १७५ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०४ भाद्र. शके १९४८, बुधवार दि.२६ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## स्कूल ठीक करो की अनधिकृत तपासणी?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

स्कूल ठीक करो हे अभियान आणि अभिजीत दीपके यांच्या शाळा भेटींमुळे सध्या कायदेशीर आणि राजकीय वर्तुळात मोठा पेच निर्माण झाला आहे. कॉकरोच जनता पार्टीचे () संस्थापक अभिजीत दीपके यांनी सरकारी शाळांमधील दुरवस्था आणि पायाभूत सुविधांचा अभाव समोर आणण्यासाठी १५ ऑगस्ट २०२६ पासून या मोहिमेची सुरुवात केली. मात्र, त्यांनी केलेल्या शाळांच्या सोशल ऑडिट आणि तपासणीच्या पद्धतीमुळे अनाधिकृत प्रवेश आणि कायदेशीर अधिकारांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शासकीय संस्था किंवा शाळांमध्ये तपासणी करण्याचे कायदेशीर अधिकार केवळ शिक्षण विभाग, जिल्हा परिषद किंवा नियुक्त सरकारी अधिकाऱ्यांना असतात. कोणत्याही खाजगी व्यक्तीला किंवा राजकीय नेत्याला पूर्वपरवानगीशिवाय शाळेत घुसून तपासणी करण्याचा अधिकार नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या काही मार्गदर्शक तत्त्वांचा दाखला देत, अशा प्रकारे थेट वर्गात किंवा शाळा परिसरात कॅमेरा घेऊन प्रवेश करणे हा ट्रेसपासिंग (बेकायदेशीर प्रवेश) ठरू शकतो, असा आक्षेप घेतला जात आहे.

वर्गात जाऊन थेट शिक्षकांना कॅमेऱ्यासमोर प्रश्न विचारणे, त्यांच्यावर दबाव आणणे आणि अल्पवयीन विद्यार्थ्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करणे यावरही आक्षेप घेण्यात आला आहे. बाल हक्क आणि गोपनीयतेच्या कायद्यानुसार विद्यार्थ्यांचे असे व्हिडिओ सार्वजनिक करणे संवेदनशील मानले जाते.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या काही व्हिडिओंमध्ये दीपके शिक्षकांना कॅमेऱ्यासमोर जाब विचारताना दिसले.यावरून त्यांच्यावर शिक्षकांवर दबाव आणणे, त्यांच्याशी उद्धटपणे बोलणे आणि शासकीय कामात अडथळा आणल्याचे आरोप होत आहेत.

कोणत्याही बाहेरील व्यक्तीने किंवा राजकीय संघटनेने पूर्वपरवानगीशिवाय शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे व्हिडिओ शूट करणे किंवा त्यांच्याकडून तक्रारींचे फॉर्म भरून घेणे हे बाल हक्क आणि शाळा सुरक्षा नियमांचे उल्लंघन मानले जाऊ शकते.

कोणत्याही शासकीय विभागाने किंवा न्यायालयाने ला शाळांचे ऑडिट करण्याचे अधिकृत अधिकार दिलेले नाहीत. त्यामुळे या प्रक्रियेला वैज्ञानिक ऑडिट न म्हणता केवळ एक नागरी सर्वेक्षण किंवा सोशल मीडिया कंटेंन्ट म्हटले जावे, अशी टीका होत आहे.

असे असले तरी, दीपके यांच्या या मोहिमेचे जमिनीवर काही सकारात्मक आणि थेट परिणामही पाहायला मिळाले आहेत.संतुक पिंपरी येथील शाळेतील तुटलेल्या खिडक्या, सीसीटीव्ही कॅमेरे आणि स्वच्छतागृहातील पाण्याच्या समस्येची दीपके यांनी पोलखोल केल्यानंतर, स्थानिक ग्रामपंचायतीने २४ तासांत तेथे दुरुस्तीचे काम सुरू केले.तसेच हिंगोलीच्याच लिंबाळा मक्ता येथील एका जिल्हा परिषद शाळेचे मुख्यध्यापक वारंवार दारू पिऊन येत असल्याची तक्रार दीपके यांनी गावकऱ्यांच्या मदतीने प्रशासनाकडे लावून धरली, ज्यानंतर संबंधित मुख्याध्यापकाला निलंबित करण्यात आले.

हा वाद आताशाळांमधील दुरवस्था सुधारणे विरुद्ध शासकीय नियमांचे उल्लंघन असा बनला आहे. शाळांची स्थिती सुधारणे हा हेतू योग्य असला, तरी अधिकृत परवानगीशिवाय कॅमेरा घेऊन शाळांमध्ये प्रवेश करण्याच्या कार्यपद्धतीमुळे अभिजीत दीपके आगामी काळात कायदेशीर कचाट्यात सापडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शाळा सुधारण्यासाठी, पायाभूत सुविधा मागण्यासाठी आणि शिक्षकांसाठी आवाज उठवण्यासाठी लोकशाही मार्गाने मोहीम चालवणे पूर्णपणे कायदेशीर आहे; मात्र, आंदोलनादरम्यान स्थानिक प्रशासनाचे नियम, शाळांच्या परवानग्या आणि बाल हक्क कायद्यांचे पालन करणे बंधनकारक असते.

शालेय प्रशासनाची पूर्व संमती न घेता अभिजीत दीपके शाळेत पोहोचतो, कॅमेरा सुरू करतो व्हिडिओ शूटिंग पण करतो. आपल्या पक्षाला आणि स्वतःला प्रसिद्ध करण्यासाठी, तो सर्व नागरी भान विसरला आहे. आधी त्याच्या देहबोलीकडे बघा. तो खासदार आहे का? सरकारी अधिकारी? एखादा अधिकारी? हा कोणत्या प्रकारचा माणूस आहे, जो शाळांची तपासणी करायला जातो? कोणत्या अधिकाराने? त्याने स्थानिक शिक्षण विभागाकडून परवानगी घेतली आहे का?

प्रशासनाने त्याला अधिकृत पास दिला आहे का? नाही, बरोबर? त्याने फक्त कॅमेरा चालू करतो १०-१२ समर्थकांच्या मागे धावतात आणि वर्गात प्रवेश करतात आणि मग ते मुलांना कॅमेऱ्यासमोर आणतात आणि व्हिडिओ बनवायला सुरुवात करतात! हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, १८ वर्षांखालील मुलाला व्हिडिओमध्ये दाखवण्यापूर्वी, त्याच्या गोपनीयतेबद्दल आणि वैयक्तिक माहितीबद्दल प्रश्न निर्माण होतात, आणि कायद्यानुसार मुलांच्या वैयक्तिक माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी पालकांची पडताळणीयोग्य संमती आवश्यक आहे.

पूर्वसंमती न घेता शाळेत जाऊन मुलांचे फोटो किंवा व्हिडिओ बनवणे हा कायदेशीर गुन्हा आहे. बालकांचे हक्क आणि गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी भारतीय कायद्यांमध्ये यासाठी कडक तरतुदी आहेत.

कोणत्याही मुलाचे त्याच्या संमतीशिवाय किंवा चुकीच्या उद्देशाने फोटो/व्हिडिओ काढणे हा लैंगिक छळ किंवा सायबर गुन्ह्याचा भाग मानला जाऊ शकतो.माहिती तंत्रज्ञान कायदा – कलम ६६): एखाद्या व्यक्तीच्या खाजगी जागेत तिच्या संमतीशिवाय तिचे फोटो किंवा व्हिडिओ काढणे आणि ते प्रसारित करणे हा गोपनीयतेचा भंग मानला जातो. यासाठी शिक्षेची तरतूद आहे. शिक्षणाचा अधिकार आणि शाळांचे नियम: शाळा ही सुरक्षित असते. मुख्याध्यापक किंवा प्रशासनाच्या लेखी परवानगीशिवाय बाहेरील व्यक्तीला शाळेत मोबाईल किंवा कॅमेरा वापरून चित्रीकरण करण्याचा अधिकार नाही.भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत मुलांचे प्रायव्हसीचे अधिकार सुरक्षित आहेत. पालकांच्या परवानगीशिवाय मुलांचे चेहरे सार्वजनिक करणे बेकायदेशीर आहे.

शाळा प्रशासन किंवा पालक संबंधित व्यक्तीविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल करू शकतात. गुन्हा सिद्ध करण्यासाठी वापरलेला मोबाईल किंवा कॅमेरा पोलीस जप्त करू शकतात. दोषी आढळल्यास गुन्ह्याच्या स्वरूपानुसार दंड आणि ३ वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

# वाचक व्यासपीठ मंचावर कै.द. भा.धामणस्कर यांच्या कवितांचे अभिवाचन !

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – कवीवर्य कै.द.भा. धामणस्कर यांच्या कविता आणि त्यांच्या काव्याविषयी समीक्षालेख अभिवाचनाचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम जीवन विकास ग्रंथालयात सादर झाला. प्राचार्य जीवन देसाई यांनी या साहित्याचे अभिवाचन केले.

जीवन विकास ग्रंथालय, टिळक नगर, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने वाचक व्यासपीठ बैठकीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम दर सोमवारी सायंकाळी ग्रंथमित्र भा.



बा. आर्वीकर सभागृहात होत आहे. वाचक व्यासपीठच्या तिसऱ्या बैठकीत दि.२४ ऑगस्टला हा कार्यक्रम सादर झाला.

कवी द.भा.धामणस्कर यांच्या भरून आलेले आकाश या काव्यसंग्रहातील कवितांचे आणि कवितारतीमधील धामणस्कर यांच्या काव्यावरील नीलिमा गुंडी यांच्या लेखाचे व निवडक कवितांचे वाचन जीवन देसाई यांनी केले. या कवितांना जाणकार श्रोत्यांनी उत्तम दाद दिली. या कविता वैशिष्ट्यपूर्ण, विविधांगी आणि उत्तम असूनही कवी धामणस्कर यांना श्रेष्ठ कवी, ख्यातनाम कवी म्हणून सन्मान मिळाला नाही, अशी खंत प्राचार्य जीवन देसाई यांनी व्यक्त केली. सादरीकरणानंतरच्या चर्चेत श्री. माधव देशपांडे, श्री. विजय पाटोदी, श्रीकांत काशीकर, श्री. चिमणपुरे, श्री. किनगावकर आदींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

बैठकीच्या सुरुवातीला डॉ यास्मिन शेख यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजशेखर बालेकर यांनी केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. विनोद सिनकर यांनी केले. या बैठकीला न्या. अंबादासराव जोशी, नितीन कंधारकर, महेश बावस्कर, नृसिंह कुलकर्णी यांच्यासह जाणकार वाचक आणि श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

# शब्दकोशाच्या रूपाने त्या आपल्यात आहेतच...

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रा. यास्मिन शेख... विलक्षण भाषिक बुद्धिमत्ता लाभलेल्या विदुषी! एकशे दोन वर्षांत पदार्पण करणाऱ्या या भाषातज्ज्ञ अक्षरशः तरुणाईला लाजवेल,आचंबा वाटेल अशा ऊर्जा, उत्साह आणि तल्लखतेने कार्यरत होत्या. प्रत्येक शब्दाच्या, वाक्याच्या, मांडणीच्या, तसेच विरामचिन्हांच्या सूक्ष्मतेसह काटेकोर आणि चिकित्सक दृष्टीने भाषेचा समग्र अभ्यास ही त्यांची वृत्ती. ज्येष्ठ लेखकाने इतर लेखकांची उमेद कशी वाढावी, लेखनाला उभारी कशी द्यावी, याचा वस्तुपाठ म्हणजे प्रा. यास्मिन शेख.(आज हे अभावाने जाणवते,म्हणून विशेष) व्याकरण आणि भाषाशास्त्र ही त्यांची अभ्यासक्षेत्रे असलेल्या प्रा.यास्मिन शेख (पूर्वाश्रमीच्या जेरुशा जॉन रूबेन) या एक ज्येष्ठ भाषा संशोधक आणि व्याकरण तज्ज्ञ म्हणून मराठी साहित्य विश्वात सुपरिचित होत्या . शब्दकोशाच्या रूपाने त्या आपल्यात आहेतच.



नाशिक येथे कन्या शाळा आणि मुलांची शाळा येथे सात वर्षे त्यांनी अध्यापन केले. मिलिंद महाविद्यालय (औरंगाबाद – आताचे छत्रपती संभाजीनगर) येथे दोन वर्षे त्या मराठीच्या प्राध्यापिका होत्या. पुढे एस.आय.ई.एस. महाविद्यालय, शीव, मुंबई येथे पंचवीस वर्षे मराठीच्या प्राध्यापिका. शेवटची सहा वर्षे मराठी विभागप्रमुख. निवृत्तीनंतर शासनाच्या 'स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह करिअर' मुंबई यांच्या वतीने 'आय.ए.एस.' च्या विद्यार्थ्यांना मराठी व्याकरण व भाषाशास्त्र शिकवण्यासाठी निमंत्रित – दहा वर्षे अध्यापन.

बालभारती पुणे या संस्थेत सात वर्षे मराठीच्या शालेय पुस्तकांचे संपादन (सहकार्याने) तसेच 'बालभारती'च्या संशोधन विभागातर्फे प्रसिद्ध झालेल्या कार्यात्मक व्याकरणाच्या पुस्तक निर्मितीत महत्त्वाचा सहभाग राहिलेला आहे.

पुण्याच्या 'अंतर्नाद' (संपादक– भानू काळे) या मराठीतील दर्जेदार मासिकात 'व्याकरण–सल्लागार' म्हणून गेली बावीस वर्षे कार्यरत होत्या . शिवाय मासिकाचे मुद्रणही केले. त्यामुळे अंतर्नाद प्रमाणलेखनदृष्ट्या निर्दोष राखण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले.

'राज्य मराठी विकास संस्था', मुंबई मा. अध्यक्षांच्या विनंतीवरून 'मराठी लेखन मार्गदर्शिका' हे भाषा तज्ज्ञांनी सुचवलेले शासनमान्य प्रमाण मराठीचे लेखनविषयक अठरा नियम सोप्या, परिचित शब्दांत, अनेक उदाहरणे देऊनत्यांनी प्रस्तुत पुस्तक लिहिले. शिवाय या नियमांत नसलेल्या, पण मराठी प्रमाणलेखनात आवश्यक असलेल्या नियमांचे स्पष्टीकरण केले आहे. यात मौलिक अशी भर घातली .

मराठीतील जोडाक्षरांचे लेखन, लेखनातील विविध विरामचिन्हे आणि त्यांचे लेखनातील (वाक्यांतील) योग्य स्थान, वाक्यरचना, (सदोष वाक्यरचना निर्दोष कशी लिहावी, याचे विवेचन) आणि शेवटच्या प्रकरणात हे शब्द असे लिहा या शीर्षकाखाली असंख्य शब्दांची दिलेली सूची मराठी भाषकांना उपयुक्त ठरत आलेली आहे. पुढेही ठरत राहील.

प्रा.यास्मिन शेख यांनी लिहिलेले दुसरे पुस्तक मराठी शब्दलेखन कोश असून उपरोक्त दोन्ही पुस्तके मराठी भाषकांना अत्यंत मार्गदर्शक व संग्राह्य आहेत, याशिवाय त्यांचे व्याकरणविषयक, परीक्षणात्मक, व्यक्तिचित्रणात्मक लेखन विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले होते .

प्रा.शेख यांना प्राप्त झालेले काही ठळक पुरस्कार... मराठी शब्दलेखन कोश (प्रथमावृत्ती) महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, डॉ.गं. ना. जोगळेकर स्मृती पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ.अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार, अंतर्नाद मासिकाच्या वतीने व्याकरण सल्लागार व मुद्रित – शोधन पुरस्कार.




✍ डॉ. नागेश अंकुश
(भाषाअभ्यासक)
मो. 94042 88766


प्रा.यास्मिन शेख यांनी प्रमाण लेखनासंदर्भात मांडलेली भूमिका अशी होती – ''सामान्य मुलांना कार्यात्मक व्याकरण सहजपणे कळावे.

मुलाला स्वतःच्या बोलण्यात आणि लिहिण्यात भाषा वापरण्याची संधी मिळायला हवी .

आपली मराठी भाषा समृद्ध आहे, तिच्यात नव्या – नव्या संकल्पना व्यक्त करण्याची ताकद आहे. ती अधिक अधिक सुंदर करणे आपल्या हातात आहे.

भाषा हा माणसाचा सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक वारसा आहे, याची जाणीव आपण ठेवायला हवी.

भाषेचा वारसा जपणे आणि समृद्ध करणे आपले कर्तव्य आहे.''

शब्दाचे नेमके अर्थ समजून घेणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच शब्दाचे बिनचूक लेखन करणेही महत्त्वाचे आहे.

शाळांमधून मराठी लेखनाबद्दलची अनास्था दिवसेंदिवस वाढते आहे.

मराठी साहित्य महामंडळाच्या लेखन नियमांना अनुसरून मराठी शब्दांचे लेखन होणे अत्यंत आवश्यक आहे.

सर्वसामान्य मराठी माणसाला मराठी शब्दांचे बिनचूक लेखन करता यावे.'' मराठी साहित्य महामंडळाच्या शासनमान्य लेखनविषयक नियमांनुसार निर्मिती असलेला प्रा .शेख यांनी लिहिलेला संदर्भसंपन्न असा लेखनकोश मराठी साहित्यात आणि भाषाक्षेत्रात मानदंड ठरलेला आहे./ ठरत आलेला आहे.

'मराठी शब्दलेखनकोशा' च्या 'पाठराखण' मधील मनोगतात ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा.ग. जाधव लिहितात, ''सध्याच्या मराठी लेखनाची दुरवस्था दूर करण्यासाठी मोठ्या तळमळीने व अभ्यासपूर्वक परिश्रमाने प्रा. यास्मिन शेख यांनी सिद्ध केलेला हा कोश ऐतिहासिक महत्त्वाचा ठरतो; कारण मराठी भाषेत यासारख्या कितीतरी वेगवेगळ्या स्वरूपाच्या कोशरचनांची गरज आहे व यासाठी अभ्यासकांनी पुढे आले पाहिजे.''

**(क्रमशः)**










# जात्यावरच्या ओव्या......

मायबापान टाकल
तरी काही ना अडल
बिनपंखांच पाखरू
थेट आभाळा भिडल ||८१३||

मायबापान टाकल
त्यान धरलीच मान
देवासारखी माणसं
जणू सोन्याचं पान || ८१५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६६




ज्योतिर्मय साहित्य


**नव्हे सार संसार हा घोर आहे ।**
**मना सज्जना सत्य शोधूनि पाहे ।**
**जनीं वीष खाता पुढे सूख कैचें ?**
**करी रे मना ध्यान या राघवाचे ।६६।**

अर्थ : हे मना, हा संसार अनित्य आणि असार आहे. घोर म्हणजे भयंकर आहे. तूच याचा जरा विचार करून सत्य शोधून काढ. एखाद्याने विष भक्षण केले तर ते वाईट परिणाम केल्यावाचून कसे राहील ? तेव्हा तू भगवंताची भक्ती कर.

विवेचन : या श्लोकामध्ये संसाराचा फोलपणा समर्थ आपल्याला पटवून देत आहेत. हा संसार असार आहे. विनाशी आहे. संसारात सुखी झाला आणि सुखदु:खे भोगावी लागली नाही असा मनुष्य आढळणे कठीण !त्यातून संसार घोर म्हणजे भयंकर आहे. संत या सगळ्यातून गेले आहेत. संत तुकारामांना भयंकर असा दुष्काळाचा सामना करावा लागला. त्यात मुलेबाळे, पत्नी यांची आहुती गेली. पण संसाराचा फोलपणा त्यांच्या लक्षात आला होता. त्यामुळेच त्यातून बाहेर काढणारी एकच गोष्ट त्यांना माहित होती. ती सारभूत गोष्ट म्हणजे विठ्ठल. त्याचाच ध्यास त्यांनी घेतला होता. सर्वच संतांनी संसाराचा हा फोलपणा लक्षात घेऊन जनसामान्यांना ईश्वरभक्तीचा उपदेश केला. आम्हाला संतांचे सांगणे समजत नाही असे नाही. पण त्यातील फोलपणा ध्यानी घेऊनही आम्ही या विषाचा अनुभव घ्यायला तयारच असतो. विष खाल्ले की ते त्याचे परिणाम दाखवणारच ! विष खाल्ले आणि चांगला अनुभव आला असे कधी होऊच शकत नाही. ते त्याचा प्रभाव दाखवणारच. इथे विष म्हणजे विषयासक्ती असाही अर्थ घेता येईल.



म्हणून समर्थ या श्लोकात म्हणतात,'' हे मना, दुसऱ्यांचे सांगणे तुला पटत नसेल तर तू स्वतः अनुभव घेऊन बघ. तू स्वतः त्यातील सत्य शोधून काढ. कधी कधी माणसे दुसऱ्याच्या अनुभवाने शहाणे होत नाहीत. म्हणून स्वतःला जो अनुभव येतो, त्यावर सारासार विचार करून त्यातून तरी योग्य निष्कर्ष आपल्याला काढता आला पाहिजे. समर्थ आपल्याला संसाराचा त्याग करा असं सांगत नाहीत तर त्यातील फोलपणा ध्यानी घेऊन त्यातील आसक्ती कमी करा असेच त्यांचे सांगणे आहे. संसाराकडे साक्षीभावाने आपल्याला पाहता आले पाहिजे. पाण्यात आणि चिखलात राहूनही जसे कमळ त्यापासून अलिप्त असते तसेच आसक्तिरहित आपल्याला संसारात राहता आले पाहिजे. **(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

# || संजय उवाच... ||



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ संशय

संशय हा माणसाच्या मनातील एक विकार आहे, या विकाराने माणूस अनेक संबंध तोडतो, हा विकार मनात जडू न देणे हेच सर्वांच्या हिताचे असते. या विकारापासून सर्वांनी दूर राहावे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# नामस्मरणापरते दुसरे हित नाही.



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

एक गृहस्थ मला भेटले. ते म्हणाले, ''मला देव पाहावासा वाटतो. तुम्ही पाहिला आहे का ?''मी म्हटले, ''पाहिला आहे.'' त्यांनी विचारले, ''तो मला दिसेल का ?'' मी म्हटले, ''दिसेल, पण या डोळ्यांनी दिसणार नाही. देवाला पाहण्याची दृष्टी वेगळी आहे.'' आज आमची विषयाची दृष्टि आहे. ती भगवंताची नाही. आपल्याला भगवंत पाहायचा असेल तर त्याला एकच उपाय : भगवंताच्या नामात राहावे. नामाशिवाय दुसरा मार्ग नाही. सगळ्यांना माझे सांगणे आहे; हे ऐकणे अत्यंत जरूर आहे. बरे ! ऐकणे कशासाठी ? तर मी बरोबर मार्गाने जातो आहे की नाही, ते कळण्यासाठी. पण नुसते ऐकून चालणार नाही; ऐकून कृती केली तरच साधेल. ती तुम्ही करा. आचरणात आणलेले तेवढेच कामाला येईल. सगळ्यांनी नामस्मरण करा. नामस्मरणासारखा कल्याणाचा दुसरा मार्ग नाही. जे सहज आपल्याजवळ आहे, अत्यंत उपाधिरहित आहे, जे कुणावर अवलंबून नाही, असे जर काही असेल तर ते भगवंताचे नाम आहे. तेव्हा शुद्धतेने, शुद्ध आचरणाने जो ते घेईल, त्याचे राम खरेच कल्याण करील.

आपल्या गुरूने जे सांगितले ते सत्य मानावे. या मार्गाने शंभर पावले गेलास तर खजिना सापडेल.' असे गुरूने सांगितले, तर दुसऱ्या मार्गाने दोनशे पावले जरी गेला तरी त्याचा काय उपयोग ? 'मला सगुण साक्षात्कार व्हावा' असे म्हणतो, पण प्रत्यक्ष बोलणारा चालणारा सद्गुरू पाहून समाधान होत नाही तर परमात्म्याचे दर्शन करून देऊन काय उपयोग ? आंबा हवा असेल तर कोय पेरल्याशिवाय कुठला मिळणार ? सद्गुरूने जे सांगितले त्यापरते माझे काही हित आहे, हे मनातच येऊ नये. आपण खरोखरी सर्वस्वी त्याचे व्हावे. नामस्मरणापरते दुसरे हित नाही. माझ्या नामाने घरात आजारी पडलेला मनुष्य बरा व्हावा म्हणणे, म्हणजे त्या नामाचा विषयाकडे उपयोग नाही का केला ? बरे झाल्यावर ज्याप्रमाणे आम्ही बाटलीतले औषध टाकून देतो, त्याप्रमाणे गरज संपली की आम्ही देवाला विसरतो. अमुक एक घडावे असे जिथे वाटते तिथे साधनात कमतरता आली. एका सद्गुरुवचनावर विश्वास ठेवला म्हणजे सुखदु:खाच्या गोष्टींचा मनावर परिणाम होत नाही. मोठा अधिकारी झाला तरी पोराबाळांबरोबर खेळताना ज्याप्रमाणे तो त्यांच्यासारखा होतो, त्याप्रमाणे व्यवहारात वागावे. आपण निर्लोभतेने वागावे. खेळात ज्याप्रमाणे आपण चुकू देत नाही, त्याप्रमाणे प्रपंचात करावे. प्रपंचाचा सहवास वरवरचा असावा. त्याचा वास आत नसावा. आत फक्त भगवंताचा वास असावा.

गुरूचरणी अत्यंत विश्वास । आणि साधनाचा अखंड सहवास । येथे प्रपंचाचा सुटला फास । हाच परमार्थाचा मार्ग आहे खास ।।

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर

### मंदिराची रचना

मंदिर हे अतिशय पुरातन असून त्याचा जिर्णोद्धार 1787 साली सरदार रघुनाथराव विंचूरकर यांनी केला. मंदिराचे बांधकाम काळ्या पाषाणात असून ,पेशवेकालीन बांधकाम शैली आहे. मंदिर अष्टकोनी आहे.

मंदिराला तीन दरवाजे आहेत. पूर्व, पश्चिम,व उत्तर दिशेला हे दरवाजे आहेत. पूर्व दरवाज्याला महाद्वार म्हणतात. पश्चिम दरवाजावर दोन बुरुज आहेत. हे मंदिर बाहेरून एखाद्या किल्ल्या सारखे दिसते. मंदिर परिसरात नाग शिल्प, गणपती, नंदी व शिव पिंड आहे .मुख्य मंदिराच्या आवारातच काही उप मंदिरे ही आहेत. त्यात रामेश्वर, भीमाशंकर, लक्ष्मी, गणपती, कालभैरव, काशी विश्वेश्वर व विठ्ठल रखुमाई यांचीही मंदिरे आहेत. छत्रपती राजाराम राजे भोसले यांनी, वेदमूर्ती उमापती पंडित यांना सनद दिली व मंदिराच्या खर्चासाठी संपूर्ण गाव चालवावे असा आदेश दिला. मंदिरात नगारखाना आहे या नगारखाण्यातील नगारे हे सरदार विंचुरकरांनी पानिपत युद्धाचे वेळी वाजविलेले आहेत. मंदिर परिसरात दगडी दीपमाळ आहे, आणि चार वीरगळी आहेत. वीरगळ म्हणजे एखाद्या शूर वीराच्या स्मरणात कोरलेले दगडी शिल्प. त्यांच्या शिल्प कले वरून या किमान पाचशे वर्षा पेक्षाही पूर्वीच्या असाव्यात असा निष्कर्ष काढला जातो. (क्रमश:)




## राग आणि एकाकीपणा का वाढत आहे?

मित्रांनो, आपल्या आजच्या जीवनशैलीत व दररोजच्या जीवनात राग क्रोध एकाकीपणाचा अतिरेक होत आहे, त्याचा अंमल जास्त वाढत आहे, तर हे का होत आहे? राग किंवा एकटेपणा या विरूद्ध आहे शांती, सुख, समाधानी आनंदी तृप्त राहाणे हे होय.आज पैशापेक्षा इतर गोष्टी दुय्यम झाल्या. सर्व साधने आहेत.. सुखसोयी रेलचेल आहे पण सुखाची झोप नाही. मने विचलित व अस्वस्थ होऊन चिडचिड व राग वाढत आहे, याला लहान मुलेही अपवाद नाही.. असे का ? पूर्ण समाधान आनंद नाही, झोपेत व्यत्यय, ताण, कंटाळा, शीण. मूड न लागणे, एकलकोडेपणा, सामाजिकतेचा अभाव, संयम नसणे व तत्काळ समाधान यामुळे राग येतो. यात आणखी एक गोष्ट भर घालते ती म्हणजे सोशल मिडियावर व डिजीटल वापर व वेळ घालविणे! वास्तविक जीवनात शिविगाळ, द्वेष, स्पर्धा, हेवा हिंसा रागावर नियंत्रण गाजवतात, त्यामुळे अडचणी वाढतात. यात आरोग्याचे धोकेही वाढतात. अती राग व सहानुभूतीचा अभाव यामुळे मानसिक, शारीरिक लहानमोठे विकार वाढतात म्हणून स्क्रिनटाईम कमी करून कुटुंब व सदस्यांनी वेळ एकत्र घालवावा. तोही मोबाईल फोनशिवाय... रात्रीचे जेवण लवकर, फिरायला जाणे, पुस्तके वाचणे, वा डायरी लिहिणे.. एकमेकापासून वेळ काढा, आज थांबतो, स्वस्थ राहा मस्त राहा सुख दु:खाचे तरंग वाचत राहा गूड़ डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि सुप्रभात.



# शरीरामध्ये कॅन्सर कसा उत्पन्न होतो?

ज्योतिर्मय साहित्य

१०) डिटॉक्सिफिकेशन..

पालक भाजीमध्ये अँटी-ऑक्सिडेंट असतात, जे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात.

राईच्या तेलाचे फायदे

राईच्या तेलात ॲन्टी ऑक्सिडंटस (-) असतात त्यामुळे राईच्या तेलाने रोज अंगाची मसाज केल्यास फंगल इन्फेक्शन, त्वचेची आग होणे. तसेच खाज येण्याची समस्या निर्माण होणार नाही.

त्वचा उजळण्यासाठी आवश्यक असे अनेक गुणधर्म मोहरीच्या तेलात असतात. त्यामुळे त्वचेला कोणतेही हानी होत नाही. खोबरेल तेलात मोहरीचे तेल मिसळून चेहऱ्यावर लावल्याने रक्तप्रवाह सुधारतो आणि त्वचा उजळते. राईचे तेल शरीराला लावल्यास स्किनवर मॉइश्चरायजरचे काम करते. त्वचा कोरडी पडण्याची समस्या उद्भवत नाही.

हिवाळ्याच्या दिवसांत टाचांना भेगा पडायची समस्या निर्माण होत असते. तुमच्या सुद्धा टाचांना भेगा पडत असतील तर तुम्ही राईचे तेल भेगांना लावल्यास आराम मिळतो. त्याचबरोबर सांधेदुखी अथवा ओठ फुटल्याची समस्या जाणवत असेल, तर राईच्या तेलाने तुम्हाला यापासून सुटका मिळू शकते

मोहरीच्या तेलातील मोनोअनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिडमुळे काही आरोग्य फायदे मिळू शकतात.

आरोग्यासाठी मोहरीच्या तेलाचे फायदे -

दम्याचा उपचार करण्यासाठी उपयुक्त, वजन कमी करण्यास उपयुक्त, ब्लड फ्लो चांगले होते, संसर्गापासून संरक्षण करते. केस आणि त्वचेसाठी फायदेशीर,

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

मोहरीच्या तेलाचे अनेक फायदे तुम्ही ऐकले असतील. डोक्यापासून पायापर्यंत मोहरीचे तेल अतिशय उपयुक्त आहे. म्हणून जर झोपण्यापूर्वी विशेषतः पुरुषांनी या दोन भागांना तेल लावल्यास त्याचे अनेक फायदे मिळतील. पहा शरीराच्या कोणत्या भागांना तेल लावणे फायदेशीर ठरेल.

शरीरासाठी अतिशय फायदेशीर असलेल्या या तेलात व्हिटॉमिन, मिनरल्स आणि अन्य पोषक घटक असतात. रात्री झोपण्यापूर्वी हे तेल लावल्यास अनेक आजार दूर राहतील आणि त्वचेचा पोत सुधारुन त्वचाही उजळेल.

लसूण, ओवा आणि मोहरीच्या तेलाचे फायदे

बहुतांश लोक स्वयंपाकासाठी मोहरीचे तेल वापरतात. अनेकजण मसाजसाठीही मोहरीचे तेल वापरतात. सर्दी, खोकला झाल्यास या तेलाने छातीला मसाज केल्याने काही दिवसांत सर्दी-खोकला दूर होतो. मोहरीचे तेल, लसूण आणि ओव्याच्या दाण्यांनी मसाज केल्यास सूज कमी होते. इन्फेक्शन टाळण्यासाठी दररोज या तेलाने मसाज करा.

प्रसूतीनंतर शरीराला मोहरीचे तेल, लसूण आणि ओव्याने मसाज करा. मोहरीचे तेल, लसूण आणि ओवा थकवा कमी करण्यासाठी खूप फायदेशीर.

***

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### चिखल

पाऊस आल्यावर होतो
सर्वत्र चिखल पहा
बाहेर ना जावे
सान अन् थोरांनी
आपली काळजी घेवून
घरातच बरे थांबावे

पावसाने होतो पहा
सर्वत्र रस्त्यावर चिखल
त्यावरुन सावकाश चालावे
हळूहळू पाऊल उचलून
पुढे काळजीने चालताना
स्वतःच स्वतःला सावरावे

# अँजिओप्लास्टीनंतरचे आयुष्य : कार्यक्रमात रुग्णांनी व्यक्त केले अनुभव



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर –अति गंभीर हृदयविकारावरील उपचारानंतर रुग्णांनी पुढील आयुष्य अधिक सुरक्षित, निरोगी आणि आत्मविश्वासाने कसे जगावे, याबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल अँड रिसर्च फाउंडेशन येथे ''लाईफ आफ्टर अँजिओप्लास्टी'' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी गुंतागुंतीच्या अँजिओप्लास्टीनंतर प्रकृतीत सुधारणा झालेल्या २६ रुग्णांना त्यांच्या नातेवाईकासह विशेषतः आमंत्रित करण्यात आले होते. यातील बहुतांश रुग्ण अत्यंत गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल झाले होते. काही रुग्णांवर अत्यंत गुंतागुंतीच्या अँजिओप्लास्टी करण्यात आल्या व उपचारादरम्यान काहींना व्हेंटिलेटर, पेसमेकर यांसारख्या अत्यावश्यक वैद्रद्यकीय सहाय्याची गरज भासली होती. परंतु डॉ. विलास मगरकर व कार्डिओलॉजिस्टच्या टीमने वेळेवर उपचार केल्यामुळे ह्या सर्व रुग्णांना नवजीवन मिळाले.

कार्यक्रमाचा उद्देश केवळ अँजिओप्लास्टीनंतर रुग्णाची प्रकृती स्थिर ठेवणे हा नसून, उपचारानंतरचे जीवन कसे जगावे, औषधांचे नियमित सेवन, वेळेवर तपासणी, योग्य आहार–विहार, व्यायाम आणि हृदयाची काळजी याबाबत रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमादरम्यान सहभागी रुग्णांची सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलच्या कार्डिओलॉजी टीमकडून सर्वसमावेशक हृदय तपासणी करण्यात आली. अँजिओप्लास्टीनंतर नियमित फॉलो–अपचे महत्त्व, औषधोपचारात सातत्य आणि भविष्यातील हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी आवश्यक जीवनशैलीतील बदल याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. विलास मगरकर यांनी विशेष मार्गदर्शनपर व सखोल व्याख्यानातून, अँजिओप्लास्टीनंतर रुग्णांनी कोणती काळजी घ्यावी, औषधे व फॉलो–अपमध्ये सातत्य का आवश्यक आहे आणि दैनंदिन जीवनात आत्मविश्वासाने कसे परतावे, याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे रुग्ण व नातेवाईकांना उपचारानंतरच्या काळातील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे मिळाली.

कार्यक्रमातील सर्वात भावनिक क्षण म्हणजे उपचारानंतर जीवनाकडे नव्याने पाहणाऱ्या रुग्णांनी व्यक्त केलेले मनोगत. अत्यंत गंभीर परिस्थितीतून बाहेर पडलेल्या रुग्णांनी कार्डिओलॉजी टीमच्या तत्पर उपचारांबद्दल आणि मिळालेल्या वैद्यकीय सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. रुग्णांसोबत त्यांच्या नातेवाईकांनीही आपले अनुभव सांगत डॉक्टर, नर्सिंग स्टाफ आणि संपूर्ण कार्डिओलॉजी टीमचे कौतुक केले. त्यांच्या अनुभवातून वेळेवर उपचार, डॉक्टरांवरील विश्वास आणि कुटुंबीयांचा आधार यांचे महत्त्व अधोरेखित झाले. या कार्यक्रमाला डॉ. विलास मगरकर व त्यांचे सहकारी डॉ. प्रवीर लाठी, डॉ. देवेंद्र बोरगावकर, डॉ. मुनीर अहमद, डॉ. रोहित वळसे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. शरद सोमानी किडनी ट्रान्सप्लांट सर्जन व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अमोल कुलकर्णी यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. गंभीर आजारांमध्ये वेळेवर तज्ज्ञांचा सल्ला घेणे, योग्य उपचार घेणे आणि उपचारानंतर नियमित वैद्यकीय देखरेख ठेवणे यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

''लाईफ आफ्टर अँजिओप्लास्टी'' हा उपक्रम दरवर्षी आयोजित करण्याचा संकल्प डॉ. विलास मगरकर आणि कार्डिओलॉजी टीमने यावेळी व्यक्त केला. अँजिओप्लास्टीनंतर रुग्णांशी केवळ उपचाराच्या काळातच नव्हे, तर उपचारानंतरही सातत्याने संवाद ठेवून त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

''अँजिओप्लास्टीनंतर उपचार संपत नाहीत; तर निरोगी जीवनशैलीची एक नवी सुरुवात होते,'' हा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यक्रमातून रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचवण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हॉस्पिटलचे ट्रस्टी राजकुमारजी धूत, अक्षयजी धूत, सुशीलकुमार मंत्री, हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. अमोल कुलकर्णी, अॅडमिनिस्ट्रेटर डॉ. प्रसाद पुंडे, संपूर्ण कार्डियाक टीम तसेच पीआर टीम यांनी विशेष सहकार्य केले.

सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलच्या अशा रुग्ण–केंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून उपचारानंतरही रुग्णांशी सातत्याने संवाद ठेवून त्यांना निरोगी आणि सुरक्षित जीवनासाठी मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ.श्री बोरगांवकर यांनी केले.

# एमआयटी पॉलिटेक्निकच्या १३ विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

## उपयोजित गणित (अप्लाईड मॅथेमॅटीक्स) विषयात १०० पैकी १०० गुण



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : एमआयटी पॉलिटेक्निक, छत्रपती संभाजीनगरच्या संगणक अभियांत्रिकी विभागातील १३ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी २०२६ परीक्षेत उपयोजित गणित (अप्लाईड मॅथेमॅटीक्स) विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरवार्थ नुकतेच संगणक अभियांत्रिकी विभागात विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेचे आदरणीय प्राचार्य प्रा. डॉ. एस. जी. देशमुख , विभागप्रमुख प्रा अरविंद नागरिक, ज्येष्ठ प्रा. आर. ए. बुरकुल तसेच शैक्षणिक विभागाचे प्रभारी अधिकारी प्रा. ए. एम. शिंदे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

गौरविण्यात आलेले गुणवंत विद्यार्थी :

अंजली घोडके, श्रावणी जाधव, श्वेता जाधव, कार्तिक जरे, अंश निकम, शेख मुस्तकीम, सर्वदा जाधव, आरती जगदाळे, समीक्षा पवार, भाग्यश्री सोनवणे, जयश्री सोनवणे, सिद्धी कल्याणी, प्राची सांगळे

या गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे त्यांचे मार्गदर्शक शिक्षक प्रा. विजय अहिर यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या मोलाच्या मार्गदर्शन व प्रयत्नांची दखल घेत संस्थेचे आदरणीय प्राचार्य प्रा. डॉ. एस. जी. देशमुख सर यांच्या हस्ते त्यांना विशेष स्मृतिचिन्ह व प्रशंसापत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य प्रा. डॉ. एस. जी. देशमुख सर यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. भविष्यातील सर्व परीक्षांमध्येही प्रामाणिकपणा, सातत्य, कठोर परिश्रम आणि दृढनिश्चय यांच्या जोरावर अशीच उत्तम कामगिरी कायम ठेवावी आणि आपल्या यशातून संस्थेचे नाव अधिक उज्ज्वल करावे, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

विशेष म्हणजे, गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशातून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, त्यांच्यामध्ये अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी आणि भविष्यात उत्तम कामगिरी करण्याची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा सत्कार समारंभ सध्याच्या प्रथम वर्षाच्या वर्गात आयोजित करण्यात आला.

१३ विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे उल्लेखनीय यश संगणक अभियांत्रिकी विभागासाठी तसेच एमआयटी पॉलिटेक्निक, छत्रपती संभाजीनगरसाठी अभिमानाची बाब आहे. या यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक शिक्षक प्रा. विजय अहिर यांचे संस्थाप्रमुख डॉ वाय ए कवडे , एम आय टी चे महासंचालक प्रा मुनिश शर्मा संस्थेचे प्राचार्य डॉ सुनील देशमुख यांनी अभिनंदन केले.

# काळसेकर काव्य पुरस्कार प्रभा गणोरकर, रवी कोरडे यांना जाहीर

**काळसेकर कुटुंबियांच्या वतीने सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून काव्य क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवींना 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' देण्यात येतो.**

ज्योतिर्मय साहित्य

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' रवी कोरडे यांना जाहीर करण्यात आला आहे. नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रीय सहभाग असणाऱ्या सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. शिवाजी विद्यापीठात लवकरच पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात येईल, अशी माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी मंगळवारी दिली आहे.

काळसेकर कुटुंबियांच्या वतीने सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून काव्य क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवींना 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' देण्यात येतो. रुपये २१ हजार आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर, आश्वासक कविता लेखन करणाऱ्या तरुण कवीला 'ऋत्विज काळसेकर पुरस्काराने' सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप रुपये १० हजारआणि सन्मानचिन्ह असे आहे.



सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री व समीक्षक प्रभा गणोरकर यांना देण्यात येत आहे. प्रभा गणोरकर या मूळच्या अमरावती येथील असून मराठीतील ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक म्हणून त्यांची साहित्यविश्वाला ओळख आहे. त्यांचे 'विवर्त', 'व्यतीत' व 'व्यामोह' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. गणोरकर यांची कविता पुरुषी पर्यावरणात स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या यातनामय आयुष्याचे अत्यंत गंभीर व संयत स्वरात केलेलं आर्त प्रकटन आहे. आधुनिक स्त्रीची संवेदनशीलता व तिच्या अस्तित्वाशी निगडीत वेगवेगळे प्रश्न गणोरकर यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाले आहेत. निसर्ग आणि सृष्टीविषयीचे एक वेगळे संवेदन त्यांच्या काव्यसृष्टीत आहे.

नव्या पिढीतील आश्वासक काव्य लेखनासाठी दिला जाणारा 'ऋत्विज काळसेकर पुरस्कार' हा छत्रपती संभाजीनगर येथील कवी रवी कोरडे यांना जाहीर झाला.

त्यांचे 'धूसर झालं नसतं गाव', 'भुंड्या डोंगरांचे दिवस' हे महत्वाचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कृषी जीवनातील पडझड, ग्रामीण व मानवी जीवनातील गुंतागुंत, ग्रामीण माणसाचे मातीशी असणारे घट्ट नाते, हरवलेल्या भूतकाळ व मातीवरील गाढ निष्ठेची ही कविता आहे. रवी कोरडे यांना यापूर्वी युवा साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

काळसेकर काव्य पुरस्काराचे हे पाचवे वर्ष असून सतीश काळसेकर काव्य पुरस्कार यापूर्वी वसंत आबाजी डहाके, नारायण कुलकर्णी–कवठेकर, अनुराधा पाटील, अरुणचंद्र गवळी यांना देण्यात आला आहे. तर ऋत्विज काळसेकर पुरस्कार दिशा पिंकी शेख, वर्जेश सोळंकी, वीरधवल परब, फेलिक्स डिसोजा यांना देण्यात आला आहे. पुरस्कार निवड समितीचे प्रा. नीतीन रिंढे (मुंबई), प्रा. नंदकुमार मोरे (कोल्हापूर) व प्रा. रणधीर शिंदे यांनी काम पाहिले.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२


### 'आत्या' : माहेरच्या मायेचा एक हळवा कोपरा

पुढे.......
वय वाढतं तसं माणसाला महागड्या भेटवस्तूंपेक्षा माणसं अधिक हवीहवीशी वाटतात– विशेषत: आपल्या माहेरच्या आठवणींशी जोडलेली माणसं. कारण ज्या घरातून ती कधीतरी सासरी गेली, त्या घरातील माणसं, आवाज, हसणं-रडणं, रुसवे-फुगवे, सण-उत्सवांची लगबग... सगळं तिच्या मनात कुठतरी जिवंत असतं. तिच्या माहेरच्या आठवणींचा शेवटचा धागा कधी कधी तिच्या भावाच्या मुलांशी जोडलेला असतो. म्हणूनच आत्याला भेटणं म्हणजे केवळ एका नातेवाईकाला भेटणं नव्हे! ते आपल्या वडिलांच्या बालपणाला भेटणं असतं. आपल्या कुटुंबाच्या जिवंत इतिहासाला भेटणं असतं. आणि आपल्या स्वत:च्या बालपणातील एका सुंदर पानाला पुन्हा अलगद स्पर्श करणं असतं.
'आत्या' हे नातं माहेरच्या अंगणातल्या त्या जुन्या, समृद्ध झाडासारखं असतं... ज्याच्या सावलीत आपण कधीतरी खेळलो होतो, ज्याच्या फांद्यांवर कधी झोका घेतला होता; आणि आयुष्याच्या उन्हात खूप पुढे आलो, तरी ज्याची शीतल सावली मनातून कधीच जात नाही... आत्या म्हणजे त्या सावलीचं मायेचं नाव!

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495





### आतुरता कृष्णजन्माची.....

पुढे......
म्हणून देवकी सांगते–"त्वत्पादाब्जं प्राप्य..."
भगवंताच्या चरणी पोहोचल्यानंतरच जीवाला खरे अभय मिळते.
इथे "चरण" म्हणजे केवळ शारीरिक पाय नव्हेत.
चरण = परमात्म्याचा आश्रय.
या संपूर्ण स्तुतीचा गूढ संदेश या १२ श्लोकांकडे एकत्र पाहिले तर एक अद्भुत आध्यात्मिक प्रवास दिसतो–

१. कृष्ण कोण आहेत?→ प्रकृतीच्या पलीकडील पुरुष.
२. ते सृष्टीत कसे आले?→ प्रत्यक्षात कुठून आले नाहीत; ते आधीपासूनच सर्वांचे अधिष्ठान आहेत.
३. मग ते सर्वत्र का दिसत नाहीत?→ कारण इंद्रिये दृश्याला पाहतात; परमात्मा द्रष्टा आहे.
४. जीवाची चूक काय?→ स्वत:ला देह समजणे.
५. संसाराचे कार्य कसे चालते?→ परमात्म्याच्या आश्रयाने प्रकृतीचे त्रिगुण कार्य करतात.
६. कृष्णाचे शुक्ल-रक्त-कृष्ण रूप काय?→ सत्त्व-रज-तम यांच्या माध्यमातून स्थिती-सृष्टी-लय.
७. कृष्ण आणि ब्रह्म वेगळे आहेत का?→ नाही. निर्गुण ब्रह्माचेच सगुण, साकार, भक्तिगम्य स्वरूप म्हणजे भगवान.
८. प्रलयात काय उरते?→ परमात्मतत्त्व.
९. कालाच्या पलीकडे कोण?→ कालाचा नियंता श्रीकृष्ण.
१०. मृत्यूच्या भयातून मुक्ती कशी?→ भगवदाश्रयाने.

वसुदेव आणि देवकी दोघेही एका क्षणी "माझा पुत्र" या भावनेतून वर उठतात आणि म्हणतात –"तू प्रकृतीच्या पलीकडील परमपुरुष आहेस."म्हणजेच कृष्णजन्माचा खरा संदेश केवळ "आज भगवान जन्मले" इतकाच नाही.तर–ज्या क्षणी आपल्या अंत:करणात परमात्म्याची ओळख होते, त्या क्षणी "माझा देह", "माझे सुख-दु:ख", "माझे कर्म", "माझा अहंकार" या मर्यादांच्या पलीकडे जाण्याची प्रक्रिया सुरू होते.
(क्रमश)

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### जिद्द-प्रत्येक अशक्य गोष्ट शक्य करणारी शक्ती

आयुष्यात काही क्षण असे येतात, जेव्हा माणूस बाहेरून नाही, तर आतून हरतो.
डोळ्यांत स्वप्न असतं... पण परिस्थिती त्याची चेष्टा करत असते. हातात मेहनत असते...
पण यश दूर पळत असतं. मनात आशा असते...
पण प्रत्येक दिवस निराशा घेऊन येत असतो.
तेव्हा माणूस स्वत:लाच विचारतो "आता किती लढायचं?" आणि त्याच वेळी मनाच्या एका कोपऱ्यातून आवाज येतो... "जोपर्यंत श्वास आहे, तोपर्यंत हार कशी मानणार?" त्या आवाजाचं नाव असतं– जिद्द.
जिद्द म्हणजे परिस्थिती नसताना स्वप्न पाहण्याची हिंमत. जिद्द म्हणजे पडल्यावर उठण्याची ताकद. जिद्द म्हणजे डोळ्यांत अश्रू असूनही चेहऱ्यावर आशा ठेवणं. जिद्द म्हणजे जगाने पाठ फिरवली तरी स्वत:चा हात स्वत:ने घट्ट पकडणं.
जिद्द म्हणजे फक्त हट्ट नव्हे. जिद्द म्हणजे अपयशानंतरही पुन्हा उभं राहण्याची ताकद.
जिद्द म्हणजे जगाने नाकारलं तरी स्वत:वरचा विश्वास जिवंत ठेवणं. जिद्द म्हणजे अश्रू डोळ्यांत असतानाही स्वप्नाकडे पाहत राहणं.
"परिस्थिती तुमची परीक्षा घेऊ शकते; पण जिद्द असेल तर ती तुमचा पराभव करू शकत नाही.जिद्द ही टाळ्यांच्या आवाजात तयार होत नाही; ती एकटेपणाच्या शांत रात्रींमध्ये तयार होते.
जेव्हा कुणी कौतुक करत नसतं... जेव्हा परिणाम दिसत नसतात... जेव्हा जवळची माणसंही म्हणतात, "आता सोड..."
तेव्हा जो माणूस पुन्हा उठतो... तोच खऱ्या अर्थाने जिद्दीचा माणूस असतो. आज तुम्ही पडला असाल तर स्वत:ला दोष देऊ नका.
उठा. आज रडलात तर लाजू नका.
अश्रू पुसा. आज हरलात तर स्वत:ला संपलेलं समजू नका. कारण एक पराभव म्हणजे पूर्ण आयुष्याचा निकाल नसतो. कधी कधी देव आपल्याला उशीर देतो...
कारण त्याला आपल्याला विजयासाठी तयार करायचं असतं. म्हणून आज परिस्थिती तुमच्या विरोधात असेल तर घाबरू नका.
ज्यांनी तुमच्यावर हसले, त्यांना उत्तर देण्यासाठी नाही...
स्वत:ला सिद्ध करण्यासाठी लढा.अशक्य ही परिस्थितीची भाषा आहे; जिद्द ही माणसाची भाषा आहे. जगाने कितीही वेळा 'नाही' म्हटलं तरी स्वत:ने 'मी पुन्हा प्रयत्न करेन' असं म्हणणं थांबवू नका. कारण पडणं हा पराभव नाही, थांबून जाणं हा पराभव आहे. तुमच्या डोळ्यांतलं स्वप्न जिवंत असेल आणि मनात जिद्द जिवंत असेल, तर आज बंद वाटणारा दरवाजा उद्या नक्की उघडू शकतो. म्हणून परिस्थिती कितीही कठीण असो–एक गोष्ट मनात कायम ठेवा: 'मी हार मानणार नाही.' कारण अनेक अशक्य गोष्टींच्या पलीकडे तुमचा विजय तुमचीच वाट पाहत असतो."जिद्द म्हणजे डोळ्यांत अश्रू नसणं नव्हे; तर अश्रूंमधूनही स्वप्न स्पष्ट दिसणं होय. परिस्थितीने तुम्हाला कितीही वेळा खाली पाडलं तरी स्वत:ला एकदा अजून उभं करा.ज्या दिवशी तुमची जिद्द तुमच्या भीतीपेक्षा मोठी होईल, त्या दिवशी अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही तुमच्या पायाशी येऊन उभ्या राहतील. आणि त्या दिवशी तुम्ही मागे वळून पाहाल... तेव्हा डोळ्यांत अश्रू असतील, पण ओठांवर एकच शब्द असेल–'मी हार मानली नाही... म्हणून आज मी इथे आहे.जेव्हा तुम्ही अपयशाच्या भीतीला पायदळी तुडवून जिद्दीचा मार्ग धराल आणि अशक्य वाटणारे ध्येय गाठाल, तोच तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा 'विजय' असेल.परिस्थितीपुढे गुडघे टेकू नका, जिद्दीचा मशाल हातात घ्या... आणि 'विचार ते विजय' या प्रवासात अशक्याला शक्य करून दाखवा!

# माणुसकीची ज्योत बनून जगलेल्या करुणामूर्ती मदर तेरेसा

**ज्योतिर्मय साहित्य**

जगाच्या इतिहासात काही व्यक्ती अशा असतात की, त्यांचे आयुष्य त्यांच्या स्वतःपुरते मर्यादित राहत नाही, ते संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणेचा दीप बनते. मदर तेरेसा हे असेच एक विलक्षण व्यक्तिमत्त्व. स्वतःसाठी फारसे काही न मागता, समाजातील सर्वात दुर्लक्षित, अनाथ, आजारी, निराधार आणि मरणासन्न माणसांसाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण करणाऱ्या मदर तेरेसा म्हणजे करुणा, सेवा आणि माणुसकीचे प्रतीक. आज त्यांची जयंती.

मदर तेरेसा यांचा जन्म २६ ऑगस्ट १९१० रोजी स्कोप्जे येथे झाला. त्यांचे मूळ नाव ॲग्नेस गोंझा बोयाज्यू होते. त्या अल्बेनियन वंशाच्या कुटुंबात जन्मल्या. वडिलांचे निधन लहानपणीच झाले. आईने मुलांमध्ये श्रद्धा, शिस्त, प्रेम आणि गरजूंची सेवा करण्याची भावना रुजवली. वयाच्या बाराव्या वर्षीच त्यांना गरीब आणि गरजू लोकांसाठी काम करण्याची तीव्र ओढ निर्माण झाली.

वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी घर सोडले आणि आयर्लंडमधील सिस्टर्स ऑफ लोरेटो या धार्मिक संस्थेत प्रवेश घेतला. तेथे त्यांना 'सिस्टर तेरेसा' हे नाव मिळाले. त्यानंतर त्या भारतात आल्या आणि ६ जानेवारी १९२९ रोजी कलकत्ता येथे पोहोचल्या. त्यांनी सेंट मेरीज स्कूलमध्ये मुलींना शिक्षण दिले. पुढे त्या शाळेच्यामुख्याध्यापिकाही झाल्या.



परंतु शाळेच्या सुरक्षित भिंतींच्या बाहेरचे कलकत्त्याचे वास्तव त्यांना सतत अस्वस्थ करीत होते. रस्त्यांवर उपाशी माणसे, आजारी लोक, अनाथ मुले, निराधार वृद्ध आणि मृत्यूच्या दारात उभे असलेले असंख्य जीव त्यांना दिसत होते.

१० सप्टेंबर १९४६ हा त्यांच्या जीवनातील निर्णायक दिवस ठरला. दार्जिलिंगकडे जात असताना त्यांना गरिबांमध्ये जाऊन त्यांची सेवा करण्याची अंतः प्रेरणा मिळाली. त्यांनी याला कॉल विथीन अ कॉल असे संबोधले. पुढे त्यांनी लोरेटो कॉन्व्हेंटमधील जीवन सोडून गरिबांमध्ये राहून त्यांची सेवा करण्याचा निर्णय घेतला.

१९४८ मध्ये त्यांनी कलकत्त्याच्या झोपडपट्ट्यांमध्ये प्रत्यक्ष काम सुरू केले. साधी पांढरी, निळ्या किनारीची साडी हा त्यांचा पोशाख झाला. त्यांच्याकडे ना मोठी संस्था होती, ना पैसा, ना साधने. पण त्यांच्याकडे होते अपरंपार धैर्य, श्रद्धा आणि माणसावरचे प्रेम.

त्यांनी रस्त्यावरील मुलांना शिकवण्यासाठी शाळा सुरू केली. आजारी आणि मरणासन्न लोकांना आधार दिला. कुणाला नकोसे असलेले, समाजाने दूर लोटलेली, अशा लोक त्यांनी आपल्या कुशीत घेतले. त्यांच्या दृष्टीने गरिबी ही केवळ पैशांची कमतरता नव्हती, एकटेपणा, उपेक्षा आणि 'आपल्याला कोणीच नको' अशी भावना हीदेखील मोठी गरिबी होती.

७ ऑक्टोबर १९५० रोजी 'मिशनरीज ऑफ चॅरिटी' या संस्थेला अधिकृत मान्यता मिळाली. या संस्थेचे ध्येय समाजातील 'सर्वात गरीबांतील गरीब' लोकांची सेवा करणे होते. पुढे या कार्याचा विस्तार भारताबाहेरही झाला. अनाथ मुले, आजारी, कुष्ठरोगग्रस्त, बेघर, मरणासन्न आणि समाजाच्या कडेला ढकलले गेलेले लोक यांच्यासाठी विविध सेवा केंद्रे उभी राहिली.

मदर तेरेसा यांची सेवा केवळ एका धर्मापुरती मर्यादित नव्हती. त्यांच्या कार्याचा लाभ विविध धर्म, जाती आणि देशांतील लोकांना मिळाला. म्हणूनच त्या जगभरातील लोकांच्या मनात आदराचे स्थान निर्माण करू शकल्या.

'मरणाऱ्यालाही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे'




मदर तेरेसा यांच्या कार्यातील सर्वात हृदयस्पर्शी भाग म्हणजे मरणासन्न लोकांची सेवा. १९५२ मध्ये त्यांनी कलकत्त्यात मृत्यूच्या उंबरठ्यावर असलेल्या निराधारांसाठी एक निवारा सुरू केला. ज्यांना रस्त्यावर मरण्याशिवाय पर्याय नव्हता, त्यांना शेवटच्या क्षणी स्वच्छ जागा, माणुसकीचा स्पर्श आणि आपलेपणा मिळू लागला.

त्यांच्या कार्यामागची भावना अतिशय साधी होती.माणूस गरीब असो वा श्रीमंत, निरोगी असो वा आजारी, त्याचा शेवटचा क्षणही सन्मानाने व्हायला हवा. हीच विचारसरणी त्यांच्या सेवाकार्याची ओळख बनली.

मदर तेरेसा यांचे कार्य जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यात रामोन मॅगसेसे पुरस्कार, नेहरू पुरस्कार आणि १९७९ चा नोबेल शांतता पुरस्कार यांचा समावेश आहे. नोबेल समितीने मानवतेतील दुःख कमी करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेतली.

**(क्रमशः)**

## जिल्हा सुतार समाजातर्फे गुणवंत गौरव सोहळ्याचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**




जालना – जालना जिल्हा सुतार समाजातर्फे गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जुना जालना येथील टाऊन हॉल, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ, समन्वयक श्रीकृष्ण सोनुने, पुण्याच्या डी. वाय. पाटील संस्थेचे संचालक विद्यानंद मानकर मार्गदर्शक, परभणी येथील प्रा. नागोजीराव पांचाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभणार असून लेखक, कवी, नाट्यकलावंत विनोद जैतमहाल प्रमुख वक्ते आहेत. या प्रसंगी संजय बोराडे, बापू भालेकर, गंगाधर पांचाळ व सतीश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

कार्यक्रमात वारकरी धर्मसंकीर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह.भ.प. सोनुने गुरुजी (कुंभारझरी), अंकुशराव टोपे महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुजाता देवरे, जालना पोलिस प्रशिक्षण केंद्राचे सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र बोराडे व सेवानिवृत्त केंद्रप्रमुख अशोक इंगळे यांचा विशेष सत्कार होईल.

आयोजन जालना जिल्हा सुतार समाज समन्वय समिती, जालना यांनी केले आहे. या वेळी संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळाच्या रुपये १ लाख बिनव्याजी योजनेचे फॉर्म फक्त १ रुपयात भरून मिळतील, अशी माहिती अध्यक्ष राजेश भालेकर यांनी कळवली आहे.

## संघर्षातून साहस, ज्ञानातून दृष्टी आणि लोकसेवेतून समाधान स्व. भगीरथजी तापडिया यांच्या जन्मशताब्दीला कृतज्ञ अभिवादन

**ज्योतिर्मय साहित्य**

पाषाण, पुणे (डॉ. श्याम कुलकर्णी) : पुणे इंटरनॅशनल सेंटर, पंचवटी, पाषाण येथे शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यसैनिक स्व. श्री. भगीरथजी तापडिया यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यासह महेश इंडस्ट्रीज ग्रुपच्या सुवर्णजयंती सोहळ्याचे दिमाखदार आयोजन करण्यात आले.



दूरदृष्टी, शिस्त, राष्ट्रभक्ती, संवेदनशीलता, आध्यात्मिक विचारधारा आणि तत्त्वचिंतन यांचा अनोखा संगम असलेले स्व. भगीरथजी तापडिया हे केवळ एका परिवाराचे कर्ते पुरुष नव्हते, तर अनेकांच्या जीवनाला दिशा देणारे कर्मयोगी शिल्पकार होते. सातारा जिल्ह्यातील तरडगावसारख्या छोट्याशा गावातून सुरू झालेला त्यांचा जीवनप्रवास संघर्ष, कर्तृत्व आणि समाजबांधिलकीची प्रेरणादायी गाथा आहे.

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाच्या प्रगती मध्ये स्व.भगीरथजींची अत्यंत महत्त्वाची भूमिका होती. त्याच्या कार्यकालात अनेक महत्वपूर्ण निर्णय घेत चे सचिव व कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी संस्थेला भक्कम दिशा दिली. आज उभी असलेली 'भगीरथ सदन' ही विद्यार्थी वसतिगृहाची भव्य वास्तू म्हणजे त्यांच्या शैक्षणिक दृष्टीचे जिवंत स्मारकच म्हणावे लागेल. या वास्तूतून भविष्यात असंख्य विद्यार्थी घडतील, हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

वैद्यकीय क्षेत्रात रुग्णांना जीवनदान देणाऱ्या लातूर येथील विवेकानंद वैद्यकीय फाउंडेशनच्या कार्यातही त्यांनी सुमारे तीन दशके विश्वस्त व प्रमुख सल्लागार म्हणून योगदान दिले. समाजसेवा, शिक्षण आणि आरोग्यसेवा या तीनही क्षेत्रांतील त्यांची बांधिलकी त्यांच्या व्यापक व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते.

आज महेश इंडस्ट्रीज ग्रुपची सुवर्णजयंती साजरी होत असताना श्री. बजरंगजी लोहिया यांच्या बरोबरीने संस्थेला दिशा देणाऱ्या निवडक १५ व्यक्तींमध्ये स्व. भगीरथजींचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण होते. त्यांच्या विचारांची आणि मार्गदर्शनाची शिदोरी घेऊनच आज या समूहाने यशाची पन्नास वर्षांची वाटचाल पूर्ण केली आहे.

''संघर्षातून साहस, ज्ञानार्जनातून दृष्टी, व्यवसायातून अनुभव, अपयशातून धैर्य, जनसंपर्कातून विश्वास आणि लोकसेवेतून समाधान'' हेच जणू भगीरथ पप्पाजींच्या जीवनाचे सूत्र होते. त्यामुळेच त्यांच्या विचारांचे संस्कार लाभलेल्या सुपुत्र श्री. राजेंद्रजी तापडिया यांनी औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करून आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळविला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत अनेक अनुयायांनीही उद्योगक्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

कर्मवीर महर्षी धोंडो केशव कर्वे आणि राष्ट्रनिर्माते यशवंतराव चव्हाण यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वां चा सहवास लाभणे, ही त्यांच्या जीवनातील आणखी एक मोठी जमेची बाजू होती. शारीरिक व मानसिक प्रगतीबरोबरच आध्यात्मिक उन्नतीलाही त्यांनी तितकेच महत्त्व दिले. अग्निहोत्राची दीक्षा स्वीकारून त्यांनी कर्मयोग, आत्मोन्नती आणि समाजसेवा यांचा सुंदर समन्वय आपल्या जीवनात साधला.

जन्मशताब्दी सोहळ्यातील विशेष आकर्षण ठरले ते त्यांचे सुपुत्र आणि यशस्वी उद्योजक श्री. राजेंद्रजी तापडिया यांनी स्मृतीपटलावर उलगडलेले पप्पाजींचे व्यक्तिमत्त्व. त्यांच्या आठवणींतून एका कर्तृत्ववान पित्याचा, मार्गदर्शकाचा आणि विचारवंताचा जीवनपट उपस्थितांसमोर जिवंत झाला.

तसेच गीता परिवाराचे तपस्वी अभ्यासक डॉ. संजयजी मालपाणी यांचे मौलिक विचार ऐकण्याची संधी उपस्थितांना मिळाली. त्यांच्या चिंतनातून भगीरथजींच्या आध्यात्मिक व तात्त्विक जीवनदृष्टीचे अनेक पैलू उलगडले.

या जन्मशताब्दी सोहळ्यास पुणेनगरीतील असंख्य प्रतिष्ठित विचारवंत, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते तसेच तापडिया परिवाराच्या स्नेहपरिघातील अनेक स्नेहांकित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. शंभर वर्षांचा कालखंड म्हणजे केवळ एका व्यक्तीच्या जन्माचा उत्सव नव्हे; तर त्या व्यक्तीने समाजाला दिलेल्या विचारांचा, संस्कारांचा आणि कर्तृत्वाचा मागोवा घेण्याचा क्षण असतो. स्व. भगीरथजी तापडिया यांनी आपल्या जीवनातून उभा केलेला संस्कारांचा दीप आजही अनेकांच्या वाटचालीला प्रकाश देत आहे. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन आणि त्यांच्या विचारवारशाला मनःपूर्वक नमन!

## सण, उत्सवांचे पावित्र्य जपा

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

तसेच, अशा गर्दीत आणि बेधुंद वातावरणात महिलांची छेडछाड, अंमली पदार्थांचे सेवन आणि मंडळांमधील हाणामाऱ्या यांसारखे गुन्हेगारी प्रवृत्तीचे प्रकार वाढीस लागतात. ज्या उत्सवांनी समाजाला जोडायचे, तेच उत्सव आज समाजाला त्रासदायक ठरू लागले आहेत.

उत्सवांचे हे बिघडलेले स्वरूप बदलण्यासाठी केवळ कायदा किंवा पोलिसांवर विसंबून चालणार नाही, तर समाज म्हणून आपल्याला आत्मपरीक्षण करावे लागेल. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आणि तरुण पिढीने उत्सवाचे लोकमंगल स्वरूप ओळखून विधायक कार्यक्रमांची आखणी करणे गरजेचे आहे. उत्सव हा १० दिवसांचा किंवा ९ दिवसांचा आनंदोत्सव असला, तरी त्याचे परिणाम समाजावर वर्षभर टिकणारे असायला हवेत. यासाठी खालीलप्रमाणे रचनात्मक आणि विधायक उपक्रम राबवता येतील.परिवर्तनाची गरज आहे.

**१. ध्वनी प्रदूषणाला फाटा आणि पारंपारिक कलांचे पुनरुज्जीवन**

मंडळांनी डीजेवर पूर्णपणे बंदी घालून लोककलेचे संवर्धन केले पाहिजे. महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा असलेली ढोल–ताशा पथके, लेझीम, गोंधळ, भारुड, पोवाडे आणि भजनांचे कार्यक्रम आयोजित करावेत. यामुळे स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळेल आणि तरुण पिढीला आपल्या खऱ्या संस्कृतीची ओळख होईल. पारंपारिक वाद्यांचा नाद मनाला आल्हाद देतो, तर डीजेचा आवाज केवळ शरीराला विद्रूपपणे हलवतो, हा फरक समजून घेतला पाहिजे.गेल्यावर्षी डी.जे.मुक्त गणेशोत्सव हि कल्पना भाऊसाहेब रंगारी मंडळाचे कार्यक्रम संयोजक पुनीत बालन ह्यांनी राबवली. पण त्याला पूर्णपणे प्रतिसाद मिळाला नाही. गावोगावी अशा प्रकारे डी.जे. मुक्त उत्सव कल्पना अमलात आणावी.




**२. आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा उपक्रम**

उत्सवासाठी जमा होणाऱ्या वर्गणीचा वापर केवळ भव्य देखावे आणि रोषणाईवर न करता, समाजोपयोगी कामांसाठी व्हावा. उत्सव काळात भव्य रक्तदान शिबिरे, मोफत डोळे आणि आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत. अवयवदानासारख्या महत्त्वाच्या विषयांवर जनजागृती करावी. मंडळांनी आपल्या परिसरात फिरते दवाखाने किंवा आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यासाठी निधी द्यावा.




**३. शैक्षणिक आणि वैचारिक प्रबोधन**

उत्सवांच्या मंचावरून अश्लील ऑर्केस्ट्रा आयोजित करण्याऐवजी व्याख्यानमालांचे आयोजन करावे. इतिहास, विज्ञान, उद्योग, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण या विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने व्हावीत. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासिका (लायब्ररी) सुरू करणे किंवा अनाथालयांना अन्नधान्य पुरवणे यांसारखे उपक्रम हाती घ्यावेत. आरतीच्या वेळी किंवा सांस्कृतिक कार्यक्रमात अश्लील गाण्यांऐवजी स्तोत्रे, देशभक्तीपर गीते आणि सामाजिक संदेश देणारी नाटके,कार्यक्रम सादर करावीत.पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ गणपती समोर उत्सवात ऋषीपंचमीला हजारोच्या संख्येने महिला गणपती अथर्वशीर्ष पठण करतात.

**४. पर्यावरणपूरक उत्सव**

सध्याच्या काळात निसर्गाचे रक्षण करणे हे सर्वात मोठे पुण्य आहे. गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिस () ऐवजी शाडूच्या, मातीच्या मूर्ती वापराव्यात. दुर्गोत्सवात रासायनिक रंगांऐवजी नैसर्गिक रंगांचा वापर केलेल्या मूर्तींची स्थापना करावी. विसर्जन हे नदी, तलाव किंवा समुद्रात करून जलप्रदूषण करण्याऐवजी, पालिकेने तयार केलेल्या कृत्रिम टाक्यांमध्ये करावे आणि मूर्ती दान चळवळीला प्रोत्साहन द्यावे. उत्सव काळात निर्माल्य (फुले, हार) पाण्यात न टाकता, त्याचे योग्य विघटन करून सेंद्रिय खत बनवावे आणि ते शेतकऱ्यांना किंवा बागांना द्यावे.

**५. स्वच्छता, शिस्त आणि अंमली पदार्थ विरोधी मोहीम**

स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत प्रत्येक मंडळाने आपल्या परिसराची स्वच्छतेची जबाबदारी घेतली पाहिजे. प्लास्टिकमुक्त उत्सवाचा संकल्प करून कागदी (वर्तमानपत्रावर नाही.) किंवा केळीच्या पानावरील प्रसादाचे वाटप करावे. सणांच्या काळात तरुणांमध्ये वाढणाऱ्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी पथके आणि समुपदेशन केंद्र चालवावीत. उत्सव हा उत्साहाचा,आनंदाचा असावा, व्यसनाचा किंवा अविचाराचा नाही, हा संदेश घराघरात पोहोचवला पाहिजे.

**ही सामूहिक जबाबदारी समजावी**

उत्सवांचे शुद्धीकरण करणे ही कोणत्याही एका व्यक्तीची किंवा शासनाची जबाबदारी नाही, तर ती संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. जोपर्यंत सामान्य नागरिक अश्लील गाणी आणि डी.जे वाजवणाऱ्या मंडळांवर जाहीर बहिष्कार टाकत नाहीत, तोपर्यंत हे चित्र बदलणार नाही. पालकांनीही आपल्या मुलांना अशा विकृत नाचापासून परावृत्त करून, त्यांना पारंपारिक आणि विधायक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.सामूहिक जबाबदारीचे भान प्रत्येकाने ठेवायला हवे.

गणेशोत्सव आणि दुर्गोत्सव हे केवळ धार्मिक उत्सव नसून ते आपल्या सामाजिक आरोग्याचे आरसे आहेत. जेव्हा आपण उत्सवातील अश्लीलता, गोंगाट आणि डामडौल बाजूला सारून तिथं ज्ञान, सेवा, पर्यावरण रक्षण आणि सामाजिक सलोख्याची पेरणी करू, तेव्हाच या उत्सवांना खरे विधायक स्वरूप प्राप्त होईल. आपण सर्वांनी मिळून संकल्प करूया की, येणारे उत्सव हे कानठळ्या बसवणारे नसून मनाला तृप्त करणारे असतील; त्यात बीभत्सता नसेल तर पावित्र्य असेल. संस्कृतीचे रक्षण करूनच आपण एक सुदृढ, सुशिक्षित आणि प्रगतीशील समाज निर्माण करू शकू. हीच विघ्नहर्त्या,गजाननाची, गणरायाची आणि आदिशक्ती दुर्गेची खरी भक्ती ठरेल.

## हॅलो, मी बाबा बोलतोय ! कशी आहेस बाळा?


**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

आम्ही आईवडील तुम्हा मुलींच्या सुखा:साठी सगळं पणाला लावुन लग्न लावुन देतो. पण तरिही सासरघरच्या लोकांच्या अपेक्षा कांही केल्या थांबतच नाहीत. बाळा अशी कित्येक उदाहरणे आहेत ज्यामध्ये फक्त आणि फक्त मुलीच गेल्या. आपल्या आईवडिलांना सोडून. कांहीही आणि कसलीच चूक नसताना.

वैष्णवी हगवणे. काय घडलं आणि किती निर्दयी मृत्यू झाला त्या लेकीचा. तिने वेळीच जर आईवडिलांना सगळं कांही सांगितलं असतं तर कदाचित तिच्या चिमुकल्या सोबत आज ती राहिली असती. पण ती लेक जीवानीशी गेली. ''आमच्या मुलीला तिच्या सासरघरी त्रास आहे. तिचे तिथे राहणे सोयीचे नाही. म्हणून आम्ही आमच्या मुलीला कायमसाठी आमच्याकडे आणलंय''. खरं सांगायचं तर या गोष्टी समाजाला टोचतात. आणि मग समाज त्या आईवडिलांना नको नको ते बोल ऐकवतो. पण समाजाचा विचार करत बसला तर आम्ही आमच्या मुलींना गमावून बसू. हे मात्र आम्हा आईवडिलांना चांगलंच समजलं पाहिजे. तरंच प्रत्येक मुलगी तिच्या आईवडिलांच्या डोळ्यासमोर सुख:रूप असेल.

बाळा, अगं आम्ही आईवडिलांनी तुम्हा मुलींच्या सुखा:साठी सासरच्या लोकांना कितीही कांही दिलं तरी त्या लोकांचं समाधान कांही होत नाही. आम्ही स्वत:ला गिरवी ठेऊन सोनं–नाणं देतो. पण तरिही तुम्हाला त्रास दिला जातोच. कसंय शैलू बाळा सगळं माहिती असूनही आम्ही आईवडिल जर वेळीच सावध नाही झालो तर तुम्हा मुलींच्या आत्महत्येला सर्वस्वी आम्हीच जबाबदार असतो. मग तुमच्या जाण्यावर आम्ही कितीही हंबरडा फोडून रडून, आक्रोश, आकांत करुन, ढसाढसा रडून त्याचा कांहीच उपयोग नसतो.




तुम्ही मुली सासरघरी कितीही जरी चांगल्या आणि मर्यादेने वागलात तरी कांही ठिकाणी तुमचं चारित्र्यहनन केलं जातंच. आम्ही जेवढं सोनं देतो त्या सोन्याच्या छोट्याश्या तुकड्या इतकं तरी तुम्हाला सुखी: ठेवलं जातं का? याचा पुरेपूर विचार आम्हा आईवडिलांनाच केला पाहिजे. बाळा, अगं लग्न झालेल्या महिन्या दोन महिन्यात मुली



आत्महत्या करतात. हे का घडतं? असा काय अपराध असतो कि मुलींना जीव द्यावा लागतो?. कुठे हुंड्यासाठी तर कुठे मुलगाच हवा या हव्यासापोटी मुलबाळ पोटात असतानाच त्या लेकीबाळींना मारून टाकलं जातं. बाळा, तुम्ही मुलींनी आत्महत्या केल्यानंतर आम्ही आईवडिलांनी तुमच्या शरीरावरील काळ्या–निळ्या जखमांचे व्रण बघुन रडायचं कि आता आमची लेक आम्हाला ''आईबाबा'' अशी हाक कधीच मारणार नाही यासाठी रडायचं. शैलू बाळा, म्हणून म्हणतो तुला जर कांही त्रास, जाच असेल तर मला सांग. अगं बाळा तुझा बाप अजून खंबीर जिवंत आहे. तु कुणालाही घाबरू नको. बाप म्हणून मी सदैव तूझ्या सोबत आहे. शैलू बाळा काळजी घे, निट सांभाळून राहा. ठेवतो फोन.

मुलींच्या सासरघरचा त्रास, जाच, अमानुषपणे केली जाणारी मारहाण हे तर सर्वश्रुत आहेच. मुलींना सासरघरी होणारा त्रास हे तिथे नांदणाऱ्या मुलींनाच ठाऊक असतं. सासर घरी आपली लेक सुखी: आहे का? कि अजून कुठल्या अवस्थेत आहे? याची काळजी केवळ आईवडिलांनाच असते. आज कित्येक अशा मुली वा स्त्रीया आहेत ज्यांना सासरघरच्या अमानुष जाच व त्रासाला सामोरे तर जावेच लागते आहे. पण स्वतःचा बळी ही द्यावा लागतो आहे. अमाप, भरमसाठ पैसा खर्च करुन मुलींचं लग्न लावुन देऊनही सासरच्या लोकांच्या अजून अपेक्षा असतातच. हे नाही दिलं ते नाही दिलं. मग प्रवास तिच्या छळाचा, त्रासाचा सुरु होतो. आणि मग आत्महत्या, जाळून मारणे, घरातून हाकलून देणे, विष पाजणे. अजून अशा कितीतरी गोष्टींना केवळ आणि केवळ ''ती'' लाच सामोरे जावे लागते.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559